Success Key Test Series	**SUCCESS KEY TEST SERIES** X-Semi **(Unit Test -1 Marathi (semi) Ch- 1 to 5)** मराठी -	DATE: TIME: 2 तास MARKS: 40 SEAT NO:

विभाग १ - गदय

प्र. १ उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)

A1) चौकटी पूर्ण करा. 2

i. गाईनं - ☐
ii. वासरू - ☐
iii. चरवीतल्या दुधाच्या धारांचं - ☐
iv. चरवी भरण्यासाठी - ☐

माझी आजी. जवळपास साडेपाच फूट उंचीची, रंगाने गोरी असूनही उन्हापावसाने रापलेल्या त्वचेची. नवऱ्यामागं सगळा संसार गळ्यात पडूनही तिसऱ्या-आमच्या-पिढीवर हुकूमत गाजवणाऱ्या आजीच्या हातात सत्तरी ओलांडली तरी काठी आली नव्हती. दात सगळे शाबूत तर होतेच; पण मोत्यासारखे चमकत राहयचे. डोकीत एकही केस काळा नव्हता. विशाल कान, धारदार नाक, चेहऱ्यावर सुरकुत्या पडूनही तरुणपणाच्या सौंदर्याची जाणीव करून देणारी चेहऱ्याची ठेवण. ताठ कणा, पायांत जुन्या वळणाच्या नालाच्या वहाणा. अंगात चोळी आणि हिरवं व लाल अशी दोन रंगांची नऊवारी इरकल लुगडी. कपाळावरचं गोंदणं दिसू नये म्हणून त्यावर लावलेला बुक्का. आजीच्या छत्रछायेखाली आमचे सर्व कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत होते.

आमच्या घरी एक गावरान गाय होती. तिला आम्ही कपिली म्हणायचो. एकाआड एक वेताला तरी खोंड ती नक्कीच द्यायची. त्यामुळं दावणीला कायम कपिलीचीच बैलं असायची. कपिली दूधही भरपूर द्यायची. आमचे वडील किंवा काका धार काढायला निघाले, की ग्लासं घेऊन आमचा मोर्चा गोठ्यात. गाईनं पान्हा सोडला, की वासरू आखडायचं न् चरवीतल्या दुधाच्या धारांचं संगीत ऐकत चरवी भरण्याची वाट बघायची.

A2) चौकटी पूर्ण करा. 2

गाय → ☐
नाव → ☐
एक वर्षा आड → ☐
दूध → ☐

A3) विभक्ती प्रत्यय ओळखून विभक्तीचे नांव दया. 2

1) नालाच्या - ☐ - ☐

2) उन्हापावसाने - ☐ - ☐

A4) स्वमत 2

"आजीच्या छत्रछायेखाली आमचे सर्व कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत होते' याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

विभाग २ - पदय

प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)

A1) आकृतिबंध पूर्ण करा. 2

1) सभेत या दोन गोष्टी करू नयेत → ☐
→ ☐

2)



श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण ।
जेणें करितां बाणे खुण । सर्वज्ञपणाची ।।१।।

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ।।२।।

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ।।३।।

तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये ।
संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ।।४।।

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य कांही ।।५।।

सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ।
पैज होड घालूं नये । कांहीं केल्या ।।६।।

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विश्वासघात ।।७।।

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ।।८।।

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ।।९।।

अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाडवावी ।
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।।१०।।

A2) i) खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा. 1

1) व्यापकपणा केव्हाही सोडू नये.

2) तोंडाळ व्यक्तीला तोंड देत राहावे.

ii) एका वाक्यात उत्तर लिहा. 1

उपकाराबद् दल संत रामदासांनी सांगितलेले कोणते नियम आहेत ?

A3) काव्य सौदंर्य लिहा 2

सभेमध्ये लाजों नये | बाष्कळपणे बोलों नये |
या ओळीतील भावसौदर्य स्पष्ट करा.

A4) अभिव्यक्ती 2

'उत्तम पुरुष लक्षणे एक उत्तम माणूस घडवू शकतात' या विधांनाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(आ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा **(4)**

जनी आर्जव तोंडू नये । पापद्रव्य जोंडू नये
पुण्यमार्ग सोंडू नये । कदाकाळी ।।

विभाग ३ - स्थ्लवाचन

प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा. **(3)**

1) यडबंबू ढब्बू या गिरिजा कीर यांच्या बालकादंबरीतील विनोद.

2) मधूच कृत्य संवेदनशील मनाचे उत्तम उदाहरण आहे या विधानाबाबत तुमचा अभिप्राय स्पष्ट करा.

विभाग ४ - भाषा अध्यन (व्याकरण)

प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.

(१) समास - **(2)**

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

सामासिक शब्द	विग्रह	समास
i) पंचारती	.....	.....
ii) गावदेवी	.....	.....

(2)

(२) वाक्यप्रचार -

खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
बळ लावणे →

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.

1) शब्दसंपत्त्ती - **(2)**

i. 'अव' उपसर्ग लावून तयार होणारे दोन शब्द लिहा.
ii. खालील शब्दांना योग्य प्रत्यय लावून शब्द तयार करा.
अ. लढा - ..... ब. नवल - .....

2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा. **(1)**

कै-या जून झालेल्या असतानाच एकीकडे पाने झडत असतात: पण झाड रुक्ष असे कधीच दिसत नाही?

विभाग ५ - उपयोजित लेखन

प्र. ५ (1) खालील विषयावर पत्र लिहा. **(5)**

मॉर्डन हायस्कून प्रभातरोड
पुणे आयोजित शैक्षिणिक सहल अजिंठा - वेरूळ येथे
दि. १ ते ६ डिसेंबर

श्री. आगार व्यवस्थापक
राज्य परिवहन मंडळ,
स्वारगेट पुणे.
यांना सहलीसाठी बसची
मागणी करणारे पत्र लिहा

विद्यार्थी प्रतिनिधी
श्री. आगर व्यवस्थापक
राज्य परिवहन मंडळ,
स्वारगेट पूणे
यांना बस सवेची
तक्रार करणारे पत्र लिहा

(2) बातमी लेखन **(5)**

विषय : - तुमच्या शाळेत बालदिन साजरा झाला याचे बातमीलेखन करा.
यात स्थळ, काळ, दिनाक, वेळ, व्यक्ती यांचा उल्लेख करावा.

बालदिन कार्यक्रमाचा वृत्तान्त

१४ नोव्हेंबर
सकाळी १० वा.

मुलांचे नृत्य, नाट्य,
गायन, कार्यक्रम

विशेषअतिथी मा. समाजसेवक
नाना पाटेकर